# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निवासी वस्तीगृहाच्या विद्यार्थ्यांबरोबर मा. आयुक्त यांनी केला दिवाळी स्नेहफराळ**

दिनांक 08 नोव्हेंबर 2023 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या संकल्पनेतून चेना येथील शाळा क्र. 10 निवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांसोबत दिवाळी सणानिमित्त स्नेहफराळाचे आयोजन करून विद्यार्थ्यांबरोबर दिवाळी साजरी करण्यात आली. प्रसंगी अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त मारुती गायकवाड, उपायुक्त रवि पवार, शिक्षणाधिकारी, माहिती व जनसंपर्क अधिकारी, सहा. आयुक्त व महापालिका शिक्षक उपस्थित होते.

सदर निवासी वस्तीगृहात ठाणे/पालघर जिल्ह्यातील अनाथ/एक पालक नसलेले 45 विद्यार्थी राहत असून महाराष्ट्रात फक्त 03 ठिकाणी असे निवासी वस्तीगृह आहे. मा. आयुक्त यांनी यंदाच्या वर्षी आपण शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर दिवाळी फराळ करावा अशी इच्छा व्यक्त केली. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना मा. आयुक्त, अति. आयुक्त, उपायुक्त व अधिकारी यांनी विद्यार्थ्यांबरोबर दिवाळी साजरी करून त्यांचे मनोबल वाढवले. तसेच मा. आयुक्त, अति. आयुक्त, उपायुक्त व अधिकारी यांच्या हस्ते फराळ वाटप करून मा. आयुक्त व सर्व अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांबरोबर एकत्रित फराळाचा आस्वाद घेतला. सदर निवासी वस्तीगृहाची मा. आयुक्त सह उपस्थित अधिकारी यांनी पाहणी केली. पाहणी करताना मा. आयुक्त यांनी वापरात न येणाऱ्या जागेचा पुरेपूर वापर करून इतर जागेत झालेली अडगळ कमी करण्याच्या सूचना दिल्या. निवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांचे शिक्षण, आहार, राहण्याच्या सोयी सुविधा, अत्याधुनिक शिक्षण, डिजिटल शाळा व विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी महापालिका नेहमीच प्रयत्नशील राहील अशी ग्वाही मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी दिली व सर्व विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करून पर्यावरणाचे रक्षण करावे असे सांगून सर्वांना दिवाळीच्या आनंददायी शुभेच्छा दिल्या.